उद्धव बाळासाहेब ठाकरे
मुख्य मंत्री
महाराष्ट्र

सत्यमेव जयते

मंत्रालय
मुंबई ४०० ०३२

**डॉक्टर, जय महाराष्ट्र!**

**राष्ट्रीय डॉक्टर दिनाच्या मन:पूर्वक शुभेच्छा !**

खरेतर हे केवळ निमित्त आहे पत्राचे. पण या निमित्ताने मला तुमच्या सेवा आणि समर्पणाला सलाम करायचा आहे.

भारतरत्न डॉ. बी. सी. रॉय यांच्या जन्मदिनानिमित्त आज आपण १ जुलै रोजी डॉक्टर्स दिन साजरा करतो आहोत. तसा तो आपण दरवर्षी साजरा करत असाल. पण ही यंदाची परिस्थिती अभूतपुर्व आणि कसोटीची आहे.

कोरोना विषाणुच्या विरोधात आपण युद्ध पुकारले आहे. या युद्धाच्या आघाडीवर तुम्ही बिनीचे शिलेदार आहात, आणि रुग्ण सेवेतून कोरोना विरोधात लढत आहात. सेवा बजावत असताना आपले कुटुंबीय, प्रियजनांपासून कित्येक दिवस दूर राहत असताना, इतरांच्या कुटुंबातील प्रियजन कोरोनाने हिरावले जाऊ नयेत म्हणून अहोरात्र मेहनत करत आहात. त्यामुळे कित्येकांसाठी तुम्ही देवदूत आहात. तुमचे हे योगदान येणाऱ्या कित्येक पिढ्या विसरणार नाहीत. तुमची अविरत सेवा आणि मेहनतीमुळेच आता आपण कोरोनाला आपल्या मागे येऊ दिले नाही, तर आपण त्याच्या मागे लागले आहोत. यातून आपण कोरोना विषाणुला हरवल्याशिवाय राहणार नाही, असा मला विश्वास आहे.

तुमच्या या समर्पणामागे तुमच्या कुटुंबाचाही मोठा त्याग आहे, हेही विसरले जाणार नाही, नव्हे त्यासाठी महाराष्ट्र कृतज्ञच राहील. या कठीण काळात सेवावृत्तीने बजाविलेल्या कर्तव्याची समृद्ध महाराष्ट्राच्या सोनेरी पानावर निश्चितच नोंद घेतली जाईल, अशी खात्रीही मी यानिमित्ताने देतो.

कोविड-१९ विषाणुच्या विरोधातील युद्धातील या योगदानासाठी आज राष्ट्रीय डॉक्टर दिनाच्या निमित्ताने आपले मन:पूर्वक आभार! पुन्हा एकदा तुमच्या सेवा, समर्पणाला सलाम!

आपला नम्र,

उद्धव ठाकरे

**उद्धव बाळासाहेब ठाकरे**

**दूरध्वनी :** ०२२-२२०२ ५१५१/२२०२ ५२२२, **फॅक्स :** ०२२-२२०२ ९२१४
**ई-मेल :** cm@maharashtra.gov.in, **वेब साईट :** www.maharashtra.gov.in